**कोरोना विषाणू प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून राज्य शासकीय कार्यालयांतील अधिकारी / कर्मचारी यांची उपस्थिती नियंत्रित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः समय- २०२०/ प्र. क्र.३५/१८ (र. व का.)**
मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १८ मार्च, २०२०.

**शासन निर्णय :**

जगभरातील अनेक देशांमध्ये कोरोना विषाणूंचा प्रसार झाला आहे. त्यामुळे आरोग्यविषयक गंभीर समस्या निर्माण झाली असून मोठ्या प्रमाणावर जिवित हानी होत आहे. कोरोना विषाणूंमुळे बाधित रुग्ण आपल्या देशातील काही ठिकाणी आढळून आले आहेत.

२. वरील पार्श्वभूमीवर, कोरोना विषाणूंचा (COVID-19) प्रसार राज्यातील कार्यालयांमध्ये होऊ नये तसेच राज्यातील अधिकारी / कर्मचारी यांना त्यांचा संसर्ग होऊ नये, यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेमधील गर्दी कमी करणे आवश्यक आहे. त्यामुळे तातडीची उपाययोजना म्हणून राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांना पुढील निदेश देण्यात येत आहेत.

अ) या पार्श्वभूमीवर शासकीय कार्यालयाचे तातडीचे व महत्त्वाचे काम चालू राहण्याच्या दृष्टीने संबंधित विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांनी, त्यांचे नियंत्रणाखालील सर्व अधिकारी / कर्मचारी यांना दररोज कार्यालयात न बोलाविता त्यांना आळीपाळीने (Rotation) कार्यालयात बोलवावे. तसेच उपस्थित अधिकारी / कर्मचारी यांना कार्यालयीन वेळेमध्ये लवचिकतेची सवलत देण्यासंदर्भातसुद्धा विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांनी त्यांचे स्तरावर निर्णय घ्यावा, जेणेकरून सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेमधील अनावश्यक गर्दी कमी होऊ शकेल. अशा प्रकारे कार्यवाही करताना कार्यालयातील एकूण अधिकारी / कर्मचारी यांची संख्या ५० टक्के राहील, याची दक्षता घेण्यात यावी. अशा प्रकारे ज्या अधिकारी / कर्मचारी यांना कार्यालयात उपस्थित राहण्यापासून सूट मिळेल, त्यांनी त्यांची प्रलंबित राहिलेली कामे कार्यालयातील उपस्थितीच्या दिवशी पूर्ण करावीत.

आ) मंत्रालयीन प्रशासकीय विभागांच्या बाबतीत मंत्रालयीन विभागातील सचिवांना त्यांच्या नियंत्रणाखालील अधिकारी / कर्मचारी यांच्यासंदर्भात वरील अधिकार असतील. यासंदर्भात संबंधित सचिवांनी वरील परिच्छेद-२ (अ) मधील मुद्यांबाबत त्यांच्या नियंत्रणाखालील अधिकारी / कर्मचारी यांचेबाबत निर्णय घ्यावा.

इ) वरील परिच्छेद-२ (अ) व (आ) बाबत विभागातील आस्थापना शाखेस अवगत करण्यात यावे, जेणेकरून अधिकारी / कर्मचारी यांच्या उपस्थितीबाबतची उचित नोंद घेणे आस्थापना शाखेस शक्य होईल.

ई) शासकीय कार्यालयातील जे अधिकारी / कर्मचारी या आपत्कालीन परिस्थितीत रजा घेऊ इच्छितात त्यांना तातडीने रजा मंजूर करावी. तसेच वैद्यकीय प्रमाणपत्र सादर न करता परिवर्तित रजासुद्धा संबंधितांना मंजूर करण्यास हरकत नाही.

उ) सर्व अधिकारी / कर्मचारी यांनी त्यांचा संपर्क पत्ता, मोबाईल क्रमांक, ई-मेल आयडी कार्यालयास उपलब्ध करून द्यावा. तसेच संपर्क पत्त्यावर ते उपलब्ध याची दक्षता घ्यावी. तसेच कार्यालयात उपस्थित राहण्याच्या सूचना प्राप्त झाल्यास त्यांना त्यानुसार कार्यालयामध्ये उपस्थित राहणे अनिवार्य राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

ऊ) उक्त आदेश सार्वजनिक आरोग्य विभाग तसेच वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग तसेच त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील कार्यालयांना लागू राहणार नाहीत. त्याचप्रमाणे क्षेत्रिय स्तरावर ज्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना त्यांच्या कामकाजाचा भाग म्हणून कार्यालयाबाहेर भेटी देणे आवश्यक असते (Field Duties) अशा कार्यालयांना त्याचप्रमाणे आपत्कालीन / अत्यावश्यक सेवा देणाऱ्या कार्यालयांनासुद्धा वरील आदेश लागू राहणार नाहीत.

उ) सदरचे आदेश दिनांक ३१ मार्च, २०२० पर्यंत आपत्कालीन परिस्थिती म्हणून लागू राहतील.

३. तरी सर्व मंत्रालयीन विभाग तसेच मंत्रालयाच्या नियंत्रणाखालील सर्व राज्य शासकीय कार्यालयांनी सदर सूचनांनुसार अंमलबजावणी करावी.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०२००३१८१८५२३३२९०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Anshu Sinha

Digitally signed by Anshu Sinha
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a3a7504068b24f4e7eb0277456c1fe4e5d31e4d0b0fdc81eb8816e33c5735b5b, serialNumber=e71208cc885f6d3c01b374ed0921df256abda4ed94d69472deb566c39b4ee68c, cn=Anshu Sinha
Date: 2020.03.18 18:56:27 +05'30'

**( अन्शु सिन्हा )**

**सचिव (प्र.सु.र.व का.)**

**प्रति,**

१. मा. राज्यपालांचे सचिव ( ५ प्रती ),
२. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद/ विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३. सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य,
४. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव ( ५ प्रती ),
५. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहायक,
६. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक,
७. मा. महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य,
८. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,
९. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
१०. प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
११. प्रबंधक , लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय,

१२. सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
१३. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१४. प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,
१५. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, मुंबई,
१६. राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त, राज्य सेवा हक्क आयोग, मुंबई,
१७. सर्व विभागीय आयुक्त,
१८. सर्व जिल्हाधिकारी,
१९. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२०. सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख / प्रादेशिक प्रमुख / कार्यालय प्रमुख,
२१. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई ( ५ प्रती ),
२२. भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी. डी. ओ. बॅरेक नं.१, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
२३. इंडियन नॅशनल कॉँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉँग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-२५.
२४. नॅशनल कॉँग्रेस पार्टी, राष्ट्रपती भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई-२१.
२५. शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-२८.
२६. बहुजन समाज पार्टी,डी-१, इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई-१,
२७. भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभवन, एस. व्ही. पटेल रोड, मुंबई.
२८. भारतीय कम्युनिस्ट (मार्क्सवादी) पार्टी, महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी मुंबई.
२९. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
३०. निवड नस्ती ( कार्यासन १८ ).